साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 31 वे
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख
संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com
रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.११९ | पाने-१२ | दि.३१/३/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.




## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूका थांबल्या

# एक वर्षापासून पंचायत समितीला आर्थिक निधी नाही-विकास कामे रखडली

करमाळा : जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका एक वर्षापासून झाल्या नाहीत, त्यामुळे पंचायत समितीवर प्रशासकाचा कारभार आहे. लोकनियुक्त सदस्य नसल्यामुळे गेल्या एक वर्षापासून राज्य व केंद्र शासनाचा आर्थिक निधी पंचायत समितीला मिळाला नाही, त्यामुळे तालुक्यातील विकासकामे रखडली आहेत. सन २०२२-२०२३ संपले पुढे काय होणार..? याकडे तालुकावासियांचे लक्ष वेधले आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेसह करमाळा पंचायत समिती तसेच राज्यातील एकूण २८ जिल्हा परिषदावर १४ मार्च २०२२ पासून प्रशासकाचा कारभार आहे. ३१ मार्च २०२३ पर्यंत निवडणूका झाल्याच नाहीत. संपुर्ण वर्षभर प्रशासकाचा कारभार आहे. शासनाच्या १५ व्या वित्त आयोग नियमावलीत जिथे प्रशासक आहे, तिथे सहा महिन्यात निवडणूका झाल्या पाहिजे. तशा निवडणुका झाल्या नाहीतर वित्त आयोगाचा निधी दिला जावू नये, असे स्पष्ट केले आहे. गेल्या एक वर्षापासून लोकनियुक्त सदस्य नसल्याने वित्त आयोगाचा कोणताही निधी मिळाला नाही. राज्यात फक्त सहा जि.प.वर लोकनियुक्त प्रतिनिधी आहेत. उर्वरीत २८ जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समितीला केंद्र व राज्य शासनाने निधी दिलेला नाही. त्यामुळे विकास कामे झालेली नाहीत.

### पंचायत समितीचा १ कोटी १८ लाखाचा आराखडा कागदावरच

करमाळा पंचायत समितीने वित्त आयोगाच्या अनुदानावर तालुक्यात विकास कामे करण्यासाठी १ कोटी १८ लाख रू. चा आराखडा तयार केला होता. त्यामध्ये महिला बचत गटांना प्रत्येक गावात कार्यालय, प्रत्येक गावात जनावरांवर उपचारासाठी खोडे उभा करणे, प्रत्येक शाळेत मुलींसाठी टॉयलेट बांधणे, अंगणवाडीत खेळणी, गावागावातील समाजमंदिरात अभ्यासिका उभारण्याचे नियोजन होते. अशा अनेक विकासात्मक कामाचा आराखडा तयार असताना वर्षभरात निधी आला नाही. यापुढे तरी हा निधी येणार का..?, राज्य शासनाने तरी स्वत:चा निधी द्यावा; अशी तालुकावासीयांची मागणी आहे.



स्वत: झेप घेतल्याशिवाय आकाश कवेत येत नाही....!

## संपादकीय..................................................!

# स्वत:ची अस्मिता..!

आपल्या तालुक्यात आजही हजारो युवक बेरोजगार आहेत. खरंतर अनेक शिक्षण घेतलेले बेरोजगार आहेत, ही बाब महत्वाची आहे. गेल्या काही दिवसापुर्वी न्यायालयात सेवक मंडळीची भेट झाली. त्यांचे बोलणे व काम करण्याची पध्दत पाहता त्यांना तुमचे शिक्षण किती झाले.. विचारले असता, एकजण बी.एस्सी ॲग्री, एकजण एम.ए. बी.एड. म्हणजे उच्चशिक्षीत मुले सेवक या पदावर कार्यरत आहेत. म्हणजे येथे शिक्षण कुचकामी पडले की नोकरी महत्वाची ठरली. खरंतर गावागावातून बेकारांची संख्या वाढत असताना, ग्रामीण भागात कामाला कामगार भेटत नाहीत हे पण वास्तव आहे. अनेक कलात्मक बाबी आपली मुले किंवा गावातील लोक करत नाहीत, ही बाब पण वास्तव आहे. आपण व्यवसायापेक्षा नोकरीला प्राधान्य देतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आज लग्नाच्या बाजारात शेतकरी, व्यावसायिका पेक्षा नोकरदाराला जास्त मागणी दिसते, याचे कारणही महत्वाचे आहे. आपण तसा व्यवसाय करत नाही किंवा उत्पादन मिळवत नाही.

करमाळा शहर व तालुक्यात मिठाई, हॉटेल व्यवसायात परप्रांतीय लोक आहेत. मध्येही बाहेरचे लोक प्रस्थापित झाले आहेत. फरशी बसवणे, पीयुपी करणे, फर्नीचर बनवणे, कलरींग करणे यासाठी बाहेरचे व्यावसायिक फिक्स झाले आहेत. ब्लास्टींग, विहीर खोदणे, रस्ते बांधणे, खडी उत्पादन करणे, बोटींगमधून वाळू काढणे, आचारी, बांधकाम व्यवसायातही बाहेरचे लोक अग्रेसर आहेत. किराणा, छोटे हॉटेल, बॅन्ड, मंडप, ट्रान्सपोर्ट आदी किरकोळ कामे करण्याची जबाबदारी आमच्याकडे रहाते. आम्ही तर फक्त छोटे व्यापार, छोटे उद्योग आणि तोट्यातील शेती व मोठ्या प्रमाणात नोकरी यापेक्षा वेगळे काय करणार की नाही..? हा खरा प्रश्न आहे.

याबाबत एक गोष्ट आहे. गोष्ट तशी साधीच आहे,पण विचार करावयास लावणारी आहे. दोन उंदीर असतात. ते एकमेकाचे चांगले मित्र असतात. एकत्र राहतात, एकत्र खातात, फिरायला एकत्र.. सतत एकत्र.. एकमेकाला सोडत नव्हते. गावात शहरातून धान्याचा ट्रक आला. वेळ रात्रीची होती, त्यामुळे हमाल माल उतरण्यास आले नाही. या दोघा मित्रांना ट्रकची खबर लागली. दोघे ट्रककडे गेले. मनसोक्त धान्य फस्त केले व दोघा मित्रांनी काही धान्य पळवलेही . त्याचवेळी गावातील काही चोर आले व त्यांनी धान्याची पोती पळविण्याचे काम सुरू केले. ही चोरा चोरी पाहून ट्रक चालकांने अचानक आपला ट्रक चालू केला व शहराकडे वळवला. त्यावेळी या दोन मित्रापैकी एकजण ट्रकमध्ये होता तर एकजण खाली होता. ट्रक वेगात सुरू झाल्याने ट्रक मधील उंदराला खाली उतरता येईना अन् खाली असलेल्याला ट्रकमध्ये चढता येईना. दोघांची ताटातूट झाली. जो शहरात गेला तो शहरी झाला अन् खेड्यात राहिला तो खेडूतच राहिला. काही वर्षानंतर शहरातील उंदीर हा माल वाहतुकीच्या ट्रकमध्ये बसून गावोगावी फिरू लागला. एक ना एक दिवस आपला मित्र मिळेल, असा त्याला विश्वास होता आणि तसेच झालेही. एक दिवस दोघे मित्र भेटले. खुप समाधान झाले. खेड्यातला मित्र म्हटला.. मित्रा तू आता इथच थांबायचं, तिकडे जायचे नाही. पण शहरी मित्र म्हणाला.. अरे बाबा माझा सर्व परिवार शहरात, आता मला कसे येथे रहाता येईल. अधून मधून येत जाईल. तु पण माझ्याकडे चल. बघ जरा शहर कसे आहे, खाण्याचे पदार्थतर विचारू नको प्रचंड स्वादीष्ट असतात.

एके दिवशी शहरी मित्राच्या आमंत्रणावरून खेड्यातील मित्र शहरात गेला. शहरात खायला तर खुप पदार्थ होते पण पदार्था पर्यंत जाताच येत नव्हते. लगेच कोणी ना कोणी यायचे आणि जीव वाचवून पळायचे. शहरी मित्र या वातावरणात वावरला होता. तो काही ना काही आणून खात होता पण खेडूत मित्र उपाशी राहीला. दुसऱ्या दिवशी तो गावाकडे नियाला. तो म्हणाला.. बाबा येथे मोठे चविष्ट पदार्थ असलेतरी सतत मरणाची टांगती तलवार. मला नको रे बाबा हे शहर.. आपले खेडेच बरे, साधे असलेतरी येथे स्वातंत्र्य आहे, जगण्यात मजा आहे..!

थोडक्यात काय तर कितीही भारी अथवा मोठी चांगली वस्तु असेल पण त्यावर मालकी दुसऱ्याची असेलतर त्यात मजा रहात नाही. साधी असली तरी स्वत:च्या मालकीची असणे ही बाब निश्चीत्तच अल्हाददायक असते. नेमके व्यवसायाचे गणितही तसेच असते.इतरांचे मोठ मोठे व्यवसाय आहेत व त्यात आपण स्वप्न पाहण्याचे हे बरोबर असत नाही. स्वत:चे काहीतरी करणे गरजेचे असते. कामगार म्हणून सुरवात केलीतर तिथे फक्त नोकरी करायची ,बरस मालक होण्याची अपेक्षा नाहीच. खरं तर अलीकडे असाच ट्रेड नियाला आहे आपण फक्त दुसऱ्याचं वैभव पहायचं. आपण आपले काही निर्माण करण्याचा विचार करायचा नाही. शिक्षणक्षेत्र पाहिलेतर जुन्या शिक्षण संस्था सोडल्या तर नव्याने संस्था उभ्या राहिल्या नाहीत. नाही म्हणायला इंग्रजी शाळांचं फॅड जोरात आहे. तालुक्यातील पश्चिम भागात काही बाहेरील व्यावसायिकांनी जमीनी घेतल्या, पण त्यांचे उद्योग उभे राहिले नाही. पण त्यांनी प्रकल्पासाठी ज्या भावात जमीन खरेदी केली त्या जमीनीची किंमत आज २५ पटीने वाढली आहे. त्यामुळे व्यवसाय न करताही संबधित लोक फायद्यात आहेत. उजनी धरण आपल्या हद्दीत पण त्यातील मासेमारी व्यवसाय करण्यासाठी बाहेरच्या लोकांना यावे लागले आहे. कारण आपण तो व्यवसाय आपला नाही असे ग्रहीत धरून आहोत. त्यामुळे त्याला आपण दुय्यम स्थान देतो.

करमाळा शहरात सुरू झालेले फर्नीचर मॉल,मोठ्या बेकरी, भांडी मॉल हे बाहेरून आलेल्यांनी सुरू केले. जेऊर येथे परप्रांतीय तरूणांनी पाव निर्मितीचा व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासून सुरू केला आहे. ते तरूण पाव बनवतात व गावागावात दुकानदार व वडापाव विक्रेत्यांना नेहून विकतात. पुर्वीचे छोटे व्यावसायीकांचे धंदे बंद पडले. तसेच जेऊर येथे केळी, द्राक्ष, डाळींब उत्पादकांना खते व औषधे देणारे व्यावसायीक गेल्या काही वर्षापासून कार्यरत आहेत, त्यांचा धंदा एक नंबर आहे. माल चोख आणि शेताला भेटी यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्याकडे ओढा आहे. जरा हिमंत बांधून नव्या क्षेत्रात उतरण्याची गरज आहे. रिकाम्या औद्योगिक वसाहतीत आपले उद्योग उभे करण्याची अवश्यकता आहे. शेतीत नवे प्रयोग करण्याची , शेती पुरक उद्योग उभारण्याची नितांत गरज आहे.इतरांना त्यांचे व्यवसाय करू द्या पण जरा थोडं आपलीही अस्तित्व राहु द्या..म्हणजे स्वत:ची अस्मिता जपा.. हीच अपेक्षा..!

## शिवाजी विष्णूपंत जगताप यांचे निधन



करमाळा (सं.प्र.) : पांडे येथील सेवानिवृत्त केंद्रप्रमुख शिवाजी विष्णूपंत जगताप यांचे २८ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. प्रौढ साक्षरता वर्ग ते केंद्रप्रमुख अशा जबाबदाऱ्या चोख पार पाडल्या आहेत. त्यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पै.गौतम शिंदे याने पटकाविला महाराष्ट्र कुमार केसरीचा बहुमान



करमाळा(सं.प्र.): इचलकरंजी येथे झालेल्या कुमार महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पोथरे येथील पै.गौतम सुरेश शिंदे याने ८० किलो वजनी गटात यशस्वी कुस्ती करून महाराष्ट्र कुमार केसरीचा बहुमान पटकावला आहे. याप्रसंगी आयोजकांनी पै.गौतम शिंदे यांचा गोल्ड मेडल देवून गौरव केला. या यशाबद्दल पै.गौतम शिंदे याचे करमाळा तालुक्यासह पोथरे ग्रामस्थांनी विशेष अभिनंदन केले.

## बापूसाहेब कांबळे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : येथील भीमनगर येथील रहिवाशी बापूसाहेब रामचंद्र कांबळे (वय-५३) यांचे गुरूवारी रात्री निधन झाले. स्व.कांबळे यांचे अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. स्व.कांबळे हे आदिनाथ कारखान्याचे माजी कर्मचारी होते. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कामगार पाहिजे
ऑफिसमधील विविध कामासाठी कामगार पाहिजे
संपर्क : 9822058106

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# करमाळ्यात डायलिसिस प्रक्रिया यशस्वी

करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या वतीने करमाळा येथे डायलिसीस सेंटर सुरू करण्यात आले आहे. आज येथे प्रथम रूग्णांना डायलिसिस सेवा देण्यात आली. सेवा करमाळ्यात उपलब्ध झाल्यामुळे संबंधित रूग्णांना आधार निर्माण झाला आहे.स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने ही सेवा करमाळा येथे सुरु करण्यात आली आहे. केम येथील रामेश्वर बिचितकर या रूग्णाला डायलिसिसची सेवा देण्यात आली. यासाठी डॉ.बबन यमकर व बबन मुळे यांनी देखभाल केली. मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यक कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांच्या प्रयत्नातून हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक दिपक पाटणे यांच्या मार्गदर्शनाखाली सेंटर सुरू झाले आहे. यावेळी यशस्वी डायलिसिस सेवा पूर्ण झाल्यानंतर रामेश्वर बिचितकर यांचा सत्कार स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटनेचे अध्यक्ष नरसिंह चिवटे यांचे हस्ते करण्यात आली. यावेळी नागेश चेंडगे, राजेंद्र मेरगळ, संजय जगताप, मारुती भोसले, निलेश चव्हाण आदी कर्मचारी उपस्थित होते. डायलिसिस सेवा सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. भावी काळात अल्प दरात सेवा देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असल्याचे शिवसेनेचे महेश चिवटे यांनी सांगितले.

### प्रधानमंत्री सुरक्षा विमा अंतर्गत

# जिल्हा बँकेकडून वारसास दोन लाखाचा धनादेश प्रदान



करमाळा(सं.प्र.): प्रधानमंत्री सुरक्षा विमा अंतर्गत दोन लाख रूपयांची रक्कम वारसास सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करमाळा शाखेकडून देण्यात आली आहे. ३ जानेवारी २०२३ रोजी खांबेवाडी येथे मोटारसायकल अपघातात फुलचंद रंगनाथ हाके यांचे निधन झाले होते. त्यांनी २३ जुलै २०१९ रोजी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना रू.१२ चा विमा फॉर्म सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करमाळा शाखेत भरून दिला होता. त्यांच्या वारसांनी बँकेकडे नुकसान भरपाईसाठी अर्ज केला होता. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करमाळा शाखेकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आला. त्याप्रमाणे विमा कंपनीकडून २४ मार्च रोजी त्यांचे वारस हिंदराज फुलचंद हाके यांना प्रदान करण्यात आले. विमा क्लेम रक्कम त्याच्या वारसांना देताना बँकेचे करमाळा तालुका सिनियर बँक इन्स्पेक्टर अभय आवटे, शाखाधिकारी एस.एन.माने व बँक कर्मचारी उपस्थित होते.

# नाईक सुभेदार ज्ञानेश्वर बागल यांचे निधन



करमाळा (सं.प्र.) : झरे येथील सैन्यात नाईक सुभेदार म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेश्वर बापूराव बागल (वय-३९) यांचे सेवेत असतानाच ग्वाल्हेर येथे निधन झाले. नाईक सुभेदार बागल यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण झरे येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे विद्यार्थी सहाय्य समितीत राहून झाले. त्यानंतर ते २५ जानेवारी २००३ रोजी सैन्यात दाखल झाले. त्यांना बढती मिळून नाईक सुभेदार पदावर कार्यरत होते. गायनसम्राट बापूराव बागल महाराज यांचे ते चिरंजीव होते. त्यांचे मागे भाऊ मेजर ब्रह्मदेव बागल, आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

## सुमित्रा घोलप यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त ग्रंथतुला व अभिष्टचिंतन सोहळा



करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्या सुमित्रा बाळासाहेब घोलप यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त ३ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता ग्रंथतुला व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन घोलप परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विकी मंगल कार्यालय, करमाळा येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक नितीन बाळासाहेब घोलप, संतोष बाळासाहेब घोलप, विजय बाळासाहेब घोलप यांनी केले आहे.

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार
M.sc. Biotech, Health & Nutritionआहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

### आ.संजयमामा शिंदे यांच्या गावभेट दौऱ्याचे फलित

# वंचित गावासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून ५ कोटी ५३ लाखाची तरतूद



करमाळा(सं.प्र.) : करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजयमामा शिंदे यांनी ८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी कालावधी मध्ये करमाळा-माढा मतदार संघातील १५२ गावातील वाडीवस्त्यांचा गावभेट दौरा केला होता. या गावभेट दौऱ्यामध्ये गावातील तसेच वाडीवस्तीवरील अडचणी समजून घेत असताना प्रत्येक गावातील शाळा, अंगणवाडी, स्मशानभुमी, रस्ते, व्यायाम शाळा, अल्पसंख्यांका मुस्लिम समाज, दलित वस्त्या यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांच्या नोंदी केल्या गेल्या. या माहितीचे दृश्य परिणाम म्हणून २०२२-२३ च्या जिल्हा नियोजन मंडळामधून करमाळा तालुक्यासाठी तब्बल ५ कोटी ५३ लाख रू.ची तरतूद करताना तालुक्यातील वंचित गावांना व दुर्लक्षित वाडी वस्तीवरील कामांना प्राधान्य देण्यात आले.

जिल्हा नियोजन मंडळामधून रावगाव, शेलगाव क, मिरगव्हाण, कविटगाव या गावांमध्ये बंदिस्त व्यायाम साहित्यासाठी प्रत्येकी ५ लाख रूपये. लव्हे आणि भाळवणी या गावासाठी खुले व्यायाम साहित्यासाठी १० लाख रूपये तसेच समाजकल्याण विभाग अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या शीर्षकांतर्गत तालुक्यातील तब्बल ८१ ग्रामपंचायतीसाठी ३ कोटी १० लाख रूपये निधीची तरतूद करण्यात आली. या निधीमधून काँक्रीट रस्ता, बंदिस्त गटार, पेविंग ब्लॉक आदी कामे केली जाणार आहेत. ३०५४ हेड अंतर्गत तालुक्यातील कुंभारगाव ते घरतवाडी, कुस्करवाडी ते इजिमा रस्ता ग्राम १८, रावगाव धगटवाडी ते शेळके वस्ती, वाघमारे वस्ती रस्ता अशा ५ रस्त्यांसाठी ५० लाख रूपये, अल्पसंख्यांक विभाग अंतर्गत मुस्लिम कब्रस्तानाच्या संरक्षक भिंती बांधणे, अंतर्गत रस्ता यासाठी वडगाव उत्तर, उमरड, कंदर, जातेगाव, रावगाव येथे प्रत्येकी ७ लाख रूपये प्रमाणे ३५ लाख रू. निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत तालुक्यातील वीट, जिंती, कोळगाव, पांगरे, जेऊर, दहिगाव, हिंगणी या गावांसाठी ६० लाख रू. असा विकास निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

प्लॉट विकणे आहे
करमाळा-जामखेड रोड वरील बायपास जवळील रस्त्यालगत दहा गुंठेचे दोन प्लॉट (एन.ए.) योग्य किंमतीत विकणे आहे.
● संपर्क ●
मो.9860188835

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

# श्री संत गोरोबाकाका कुंभार पतसंस्थेची १७ व्या वर्षाकडे यशस्वी वाटचाल



करमाळा : येथील श्री संत गोरोबाकाका कुंभार नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना ८ मार्च २००७ रोजी झाली. पतसंस्थेची स्थापना करमाळा तालुका सर्व कुंभार समाजबांधवाच्या वतीने करण्यात आली. सर्व समाज बांधवांनी करमाळा तालुक्यात दोन हजार सभासद गोळा करण्यात आले. समाजातील बांधवांची आर्थिक अडचण होवू नये व सुशिक्षित बेकार यांचा विचार करण्याच्या उद्देशाने पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेचा कारभार चोख व पारदर्शक असल्याने २०२०-२०२१, २०२२ या दोन्ही वर्षी कोरोनासारख्या महामारीमध्ये सुध्दा आजतागायत संस्थेची वाटचाल व्यवस्थित चालू आहे. पतसंस्थेकडून ठेवीदारांना आकर्षक व्याजदर देण्यात येत असून ४६ दिवस, ९१ दिवसासाठी ६ टक्के., १८० दिवसासाठी ८ टक्के., १३ महिनेसाठी १०.५ टक्के तसेच ज्येष्ठ नागरीकांना १३ महिनेसाठी ११ टक्के व्याज देण्यात येत आहे. दामदुप्पट ठेव ८५ महिने (७ वर्षे १ महिने), पिग्मी ठेव ५ टक्के, सेव्हींग ठेव ४ टक्के, स्थावर तारण कर्ज व्याजदर १५ टक्के आहे. ३१ मार्च २०२३ अखेर पतसंस्थेची सांपत्तीक स्थिती चांगल्या प्रकारची आहे. सध्या पतसंस्थेचे वसुल भागभांडवल २५ लाख २५ हजार १५० रूपये असून, निधी ११ लाख ५ हजार २७६ रू., ठेवी १ कोटी १ लाख २७ हजार १०५ रू., खेळते भांडवल ५० लाख ४५ हजार ६५७ रू., नफा ३ लाख २५ हजार २९ रू., गुंतवणूक २५ लाख ५१ हजार ३५७ रू., कर्ज वाटप - १ कोटी २१ लाख ६४ हजार ९२१ रू., पिग्मी ठेव ४७ लाख १६ हजार ४६६ रूपये आहे.

संस्थेचे सर्व सभासद तसेच संचालक मंडळ, कर्मचारी वृंद, पिग्मी एजंट, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांच्या सहकार्यातून श्री संत गोरोबाकाका कुंभार पतसंस्थेने १७ व्या वर्षाकडे यशस्वी वाटचाल केली आहे; असे मत चेअरमन सुनिता महादेव यादव यांनी व्यक्त केले.

# नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये पालक सभा संपन्न



करमाळा (सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लिश मेडियम स्कुल व ट्विंकलींग स्टार्स मध्ये चौथी ते आठवी पर्यंत पालक सभा संपन्न झाली. यावेळी शाळेच्या संचालिका सुनिता देवी, मुख्याध्यापिका सुनिता मोहिते यांचेसह पालक वर्ग उपस्थित होते. मुलांची आत्तापर्यंत झालेली प्रगती, पुढे विद्यार्थ्यांची प्रगती करण्यासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी तसेच शाळेबद्दल पालकांची मते हे चर्चेचे विषय होते. पालकांनी शाळेबद्दल आपले मत व्यक्त करताना शाळेचे व शिक्षकांचेही भरभरून कौतूक केले. दहावी नंतर या शाळेतून बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली कशी प्रगती केली; याविषयीचेही अनुभव त्यांनी सांगितले. यावेळी सुनिता देवी म्हणाल्या, की मुलांची प्रगती करण्यासाठी तसेच योग्य संस्कार करण्यासाठी शिक्षक व पालक दोघांनीही मिळून काम केले तर निश्चितच ही मुले प्रगतीपथावर जातील व आपल्या शाळेचे नाव सुध्दा उज्वल करतील. सुत्रसंचालन अश्विनी क्षीरसागर यांनी केले तर आभार सौ.बागल यांनी मानले.




डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# मकाई, आदिनाथ कारखान्यावर प्रशासक नेमावा : शंभुराजे जगताप



करमाळा (सं.प्र.) : निवडणूक निधी व परिपूर्ण मतदार यादी सादर करण्यास जाणीवपूर्वक विलंब केल्याने मकाई व आदिनाथ सहकारी साखर कारखान्यावर त्वरीत प्रशासक नेमावा व निवडणूक प्रक्रिया पार पाडावी; अशी मागणी करमाळा तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष शंभुराजे जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री अतुल सावे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात श्री.जगताप यांनी म्हटले आहे, की मकाई व आदिनाथच्या संचालक मंडळाची मुदत संपली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव डॉ.पी.एल.खंडागळे यांनी पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडण्याबाबत १५ फेब्रुवारी २०२३ रोजीच आदेश दिलेले आहेत. तरी देखील मकाई व आदिनाथ साखर कारखान्याच्या सत्ताधाऱ्यांकडून पराभवाच्या भीतीने आणि आपण केलेल्या भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडेल; या भीतीपोटी निवडणूक निधी व परिपूर्ण मतदार यादी सादर करण्यास जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याचा आरोप केला आहे. नुकतेच राहुरी येथील डॉ.तनपुरे साखर कारखान्यावर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने कळवून देखील निवडणूक निधी जमा न केल्यामुळे जिल्हा उपनिबंधकांच्या अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर शासनाने तात्काळ मकाई व आदिनाथचे संचालक मंडळ बरखास्त करून कारखान्यावर प्रशासन नियुक्त करावा व प्रशासकाच्या अधिपत्याखाली निवडणूक प्रक्रिया पार पाडावी; अशी मागणी श्री.जगताप यांनी केली आहे.

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: करमाळा शहर व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते, की.. खालील परिशिष्टात वर्णन केलेली दत्तपेठ येथील दुकानाबाबत आमचे अशिल श्री.अभय शंकरराव येवले यांच्या संमतीशिवाय कोणताही व्यवहार करू नये. सदर मिळकत/दुकान जागा आमचे अशिल अभय शंकरराव येवले यांनी सन २०१४ साली श्री.बिभिषण वामन जाधव यांना विकली आहे. परंतू श्री.बिभिषण वामन जाधव यांनी खरेदीपोटीची मोठी रक्कम आमचे अशिलास आजपावेतो दिलेली नाही. म्हणून आमचे अशिल यांनी श्री.जाधव यांचे विरूध्द मुंबई येथील बोरीवली कोर्टात फौजदारी केस क्र.२९६९/पी/२०१६ दाखल केलेली आहे. त्यामुळे श्री.जाधव यांचा व्यवहार अपूर्ण आहे. अशा परिस्थितीत कोणीही श्री.जाधव यांचेशी व्यवहार केल्यास तो आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे.

परिशिष्ट : मौजे करमाळा नगरपरिषद व शहर सीटी सर्व्हे नं.२७४५ व २७४४, मु.घर नं.२७७६, दत्तपेठ, करमाळा, जि.सोलापूर.

सही/-
अॅड.देवराव ढाळे (मो.९८२२१९३८२६)

# ॥ ऋणनिर्देश ॥



**स्व.शिवाजी विष्णुपंत जगताप**
(मृत्यू दि.२८/३/२०२३)

**ज्योत अनंतात विलीन झाली**
**स्मृती आठवणीने आठवणींना दाटून आली**
**भाव सुमनांची ओंजळ भरूनी, वाहतो आम्ही श्रध्दांजली !**

सेवानिवृत्त केंद्रप्रमुख **कै.शिवाजी विष्णुपंत जगताप** (पांडे, ता.करमाळा) यांचे निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना ! या दु:खद प्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच आमचे स्नेही, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार व ज्ञात/अज्ञात मान्यवर व्यक्तींनी आमच्या दु:खात सहभागी होऊन आम्हांस धीर दिला. अशा सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

**दशक्रिया विधी : गुरूवार, दि.६/४/२०२३ रोजी सकाळी ९ वा. श्री क्षेत्र संगोबा येथे होणार आहे.**

**शोकाकुल**

दत्तात्रय विष्णुपंत जगताप प्रकाश विष्णुपंत जगताप मधुकर विष्णुपंत जगताप
राजकुमार विष्णुपंत जगताप (माजी मुख्याध्यापक, कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय करमाळा)
संभाजी मनोहर जगताप (मुख्याध्यापक, गिरधरदास देवी विद्यालय करमाळा)
गं.भा.सुनिता शिवाजी जगताप (पत्नी), सौ.गितांजली विठ्ठल गाडेकर (कन्या), डॉ.विठ्ठल लक्ष्मण गाडेकर (जावई)
नारायण गोटिराम पवार (सासरे), माधव शिवाजी जगताप, नवनाथ शिवाजी जगताप

**समस्त जगताप परिवार पांडे**

**● समस्त पवार परिवार भवानीपेठ, करमाळा. ● प्राथमिक शिक्षकवृंद परिवार, करमाळा.**


सचिव
कर्मयोगी
युवक नेते
मा.सभापती, पं.स.
युवा नेते
माजी आमदार
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
श्री.धुळाभाऊ कोकरे
श्री.दत्तात्रय रणसिंग
प्रा.विलास ठोकळ सर
प्रा.अर्जुनराव विठ्ठल सरक (सर)
यांना सेवानिवृत्तीबद्दल तसेच भारत शिक्षण प्रसारक
मंडळाच्या सचिव पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
लोकनेते नारायण(आबा) पाटील ग्रा.बि.सह.पतसंस्था मर्या; जेऊर
संचालक मंडळ : विलास दिनकर पाटील, सुलेमान अब्बास मुल्ला, विष्णू भानुदास गुटाळ, शिवाजी सिद्राम गावडे,
परेशकुमार प्रवीणकुमार दोशी, डॉ.अतुल कांतीलाल लुणावत, चंद्रकांत अर्जुन बोराडे, सौ.वंदना नातू शिंगाडे, रूक्मीणी किसन माने,
व्यवस्थापक-शेख महंमद सलीम उमर सर्व सभासद, कर्मचारी व पिग्मी एजंट


श्री संत गोरोबाकाका कुंभार नागरी सहकारी
पतसंस्था मर्या; करमाळा च्या १६ व्या वर्धापन दिनास
तसेच संस्थेचे संस्थापक/मार्गदर्शक व माजी चेअरमन
श्री.महादेव आनंदराव यादव (गुरूजी)
यांच्या ५७ व्या वाढदिवसास
2 April
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
● सौ.सुनिता महादेव यादव (चेअरमन) ● श्री.शिवशंकर पांडूरंग क्षीरसागर (व्हा.चेअरमन)
● संचालक : श्री.संपतराव दिगंबर जाधव, श्री.चंद्रकांत जयराम कुंभार, श्री.विष्णू रामकृष्ण कुंभार
सौ.राजश्री नवनाथ गोरे, श्री.नरसिंग गोकुळसिंग परदेशी, श्रीमती रूक्मीणी विठ्ठल कुंभार
श्री.सारंग सुंदरलाल परदेशी, श्री.अशोक रमेश भोसले, श्री.महादेव आनंदराव यादव(सचिव)
● कर्मचारी वृंद : ज्ञानेश्वर पांडूरंग क्षीरसागर(कॅशिअर)
उत्तम रामचंद्र क्षीरसागर(मॅनेजर) ● विशाल विठ्ठल कुंभार(क्लार्क) ● पिग्मी एजंट व सभासद
श्री संत गोरोबाकाका कुंभार नागरी सह. पतसंस्था मर्या; करमाळा

स्नेह निमंत्रण

॥ श्री गणेशाय नम: ॥

# आपणांस आग्रहाचे निमंत्रण

आशिर्वाद



स्व.बाळासाहेब (आबा) घोलप

७५ वा वाढदिवस



आमच्या मातोश्री

## श्रीमती सुमित्रा (आक्का) बाळासाहेब घोलप (मा.उपनगराध्यक्षा)

यांच्या

**अमृतमहोत्सवी** वर्षपुर्तीनिमित्त

**सोमवार दि.३/४/२०२३ रोजी सायं. ७.०० वा**

## ग्रंथतुला व अभिष्टचिंतन सोहळा

आयोजित केला असून, आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !

**भोजन वेळ**
सायंकाळी ७.३० ते आपल्या आगमनापर्यंत

**स्थळ**
विकी मंगल कार्यालय
एस.टी.स्टॅन्ड समोर
करमाळा., जि.सोलापूर

**निमंत्रक**

श्री व सौ.साधना नितीन बाळासाहेब घोलप | श्री व सौ.सिंधु संतोष बाळासाहेब घोलप
श्री व सौ.लता विजय बाळासाहेब घोलप | सौ.वंदना सिध्दार्थ चव्हाण(घोलप)

**समस्त घोलप परिवार**

**सौजन्य**

**घोलप पेंटस्** गायकवाड चौक, करमाळा.

**घोलप मेडिकल** पुणे रोड, करमाळा.

---

मा.उपनगराध्यक्षा

## श्रीमती सुमित्रा (आक्का) बाळासाहेब घोलप

यांच्या **'अमृतमहोत्सवी'** वाढदिवसानिमित्त..

हार्दिक शुभेच्छा



**शुभेच्छुक**

श्री.विजय(भाऊ) लावंड, श्री.जोतीराम (नाना) लावंड
श्री.शिवाजी लावंड, लावंड परिवार, करमाळा.

**सौजन्य**

**हॉटेल मातोश्री** नगररोड, करमाळा.

---

# ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



कै.शिवाजी दौलत झोळ

आठवण येता तुमची कंठ दाटूनी येतो
प्रेम देऊनी जगाला, तुम्ही माणसे जोडली
कोठून आणावी अशी दिव्यमुर्ती, पुनर्जन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी !

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक, आदिनाथ सह.साखर कारखान्याचे माजी संचालक तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य **कै.शिवाजी दौलत झोळ** यांचे दि.१५/३/२०२३ रोजी निधन झाले. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

**शोकाकुल**

ॲड.पांडूरंग महादेव झोळ (डांगे चौक, पुणे)
* सोमनाथ(आण्णा) वसंत झोळ (सामाजिक कार्यकर्ते) * विशाल(पांडू) रामाआण्णा झोळ (युतण्या)
आप्तेष्ट, नातेवाईक व समस्त झोळ परिवार, वाशिंबे

### प्रा.अर्जुनराव सरक यांच्या सेवापुर्ती समारंभानिमित्त

## ३१ मार्च रोजी जेऊर येथे व्याख्यान व ग्रंथतुला कार्यक्रम



करमाळा(सं.प्र.) : प्रा.अर्जुनराव सरक यांच्या सेवापुर्ती समारंभानिमित्त ३१ मार्च रोजी जेऊर येथे व्याख्यान व ग्रंथतुला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती संयोजन समितीचे प्रमुख प्रा.डॉ.संजय चौधरी यांनी दिली.

भारत हायस्कुल ज्युनियर कॉलेजच्या व्यवसाय अभ्यासक्रम विभागाचे प्रमुख प्रा.अर्जुनराव सरक हे ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त होत असून, भारत शिक्षण प्रसारक मंडळ व माजी आमदार नारायण पाटील मित्र मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने एक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाबाबत माहिती देताना प्रा.डॉ.चौधरी यांनी सांगितले, की ३१ मार्च रोजी भारत हायस्कुल समोरील कर्मयोगी गोविंदबापू पाटील सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सकाळी दहा वाजता कार्यक्रमास सुरूवात होणार आहे. पुणे शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत व करमाळा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार नारायण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्यदिव्य कार्यक्रम संपन्न होणार आहे. यावेळी जिल्हापरिषद व पंचायत समितीचे आजी-माजी पदाधिकारी आणि सहकार व स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी हे सुध्दा उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील विविध शिक्षण संस्थेच्या पदाधिकारी तसेच शिक्षक यांनाही आवर्जुन निमंत्रण दिले गेले आहे. या समारंभात लेखक व विचारवंत प्राचार्य डॉ.महेंद्र कदम यांचे 'ग्रामीण शिक्षण व्यवस्थेपुढील आव्हाने व संधी ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तसेच यावेळी प्रा.अर्जुन सरक यांची ग्रंथतुला करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन प्रा.डॉ.संजय चौधरी यांनी केले आहे.

यावेळी भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अनिलकुमार गादीया, पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर, भारत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनंतराव शिंगाडे, हायस्कुल व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य केशव दहिभाते, प्रायमरीचे मुख्याध्यापक दिपक व्यवहारे, पांडुरंग वाघमारे, भीमराव सरक, राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते.






## शहरातील नाभिक समाजमंदिरासाठी दहा लाख रूपये मंजूर

करमाळा(सं.प्र.): माढा मतदार संघातील खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या सहकार्याने करमाळा शहरातील नाभिक समाज मंदिरासाठी दहा लाख रूपये मंजूर झाले आहेत. वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत करमाळा नगरपरिषद शहर हद्दीतील नाभिक समाज मंदिरासाठी दहा लाख रूपये निधी मिळाला आहे. यासाठी करमाळा भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, शंभुराजे जगताप यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी नाभिक समाजाचे नारायण पवार, जयंत दळवी, राजेंद्र जगताप, अनिल क्षीरसागर, हरिदास कोकाटे, विष्णू रंदवे, गणेश जगताप, गोविंद जाधव, संतोष जगताप, अशोक राऊत, अच्युत दळवी, मार्तंड सुरवसे, विलास काळे, दत्तात्रय जगताप, आदिनाथ रंदवे, रवी राऊत, कमलेश काशिद, नाना खंडागळे, सचिन जगताप, दत्तात्रय काळे, दत्तात्रय राऊत आदी समाजबांधवांनी भारतीय जनता पक्षाच्या सर्व नेत्यांचे आभार मानले आहे.

### इतर खर्चाला फाटा देऊन मुकबधीर विद्यालयात

## परशुराम कांबळे यांच्या मुलीचा वाढदिवस साजरा



करमाळा(सं.प्र.) : श्री जगदंबा कमलाभवानी मुकबधीर निवासी विद्यालय श्रीदेवीचामाळ येथे करमाळ्यातील प्रसिध्द टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्सचे मालक परशुराम कांबळे यांनी इतर खर्चाला फाटा देऊन मुकबधीर विद्यालयामध्ये आपली मुलगी संस्कृती हिचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. या वाढदिवसानिमित्त विद्यालयास भोजन देऊन मुकबधीर विद्यालयाच्या मुलांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण केले. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय काळे, गणेश सातपुते, मल्लीनाथ पटणे यांचेसह सर्व शिक्षक उपस्थित होते. सुत्रसंचालन ज्ञानदेव गुरमे यांनी केले आभार रोहन भालेराव यांनी मानले.


# इरा पब्लिक स्कुल

केडगाव फाटा, चिखलठाण नं.१, ता.करमाळा.

## शिक्षक पाहिजेत

| क्र | सहशिक्षक पद | शैक्षणिक पात्रता | जागा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक सहशिक्षक | H.S.C.,D.Ed | ४ | ३ वर्षे |
| २ | माध्यमिक सहशिक्षक(मराठी) | B.A.,B.Ed | १ | ३ वर्षे |
| ३ | माध्यमिक सहशिक्षक(हिंदी) | B.A.,B.Ed | १ | ३ वर्षे |
| ४ | माध्यमिक सहशिक्षक (इतिहास/भुगोल) | B.A.,B.Ed | १ | ३ वर्षे |
| ५ | माध्यमिक सहशिक्षक (विज्ञान/गणित) | B.Sc.,B.Ed | २ | ३ वर्षे |
| ६ | शारीरिक शिक्षण | B.P.Ed / M.P.Ed | १ | ३ वर्षे |
| ७ | लिपिक(महिला) | B.A. / B.Com (संगणक ज्ञान) | १ | ३ वर्षे |
| ८ | सेविका | १० वी पास | १ | |

- मुलाखतीसाठी येताना दोन पासपोर्ट साईज फोटो, बायोडाटा, कागदपत्रांची मुळप्रत व झेरॉक्स आवश्यक आहे.
- **मुलाखतीची दिनांक/वेळ :** शनिवार, दि.८/४/२०२३ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ पर्यंत
- **मुलाखतीचे ठिकाण :** इरा पब्लिक स्कुल, केडगांव फाटा, चिखलठाण नं.१, ता.करमाळा. मो.९८५०७८०७८९, ९७६३६४४४०३

**प्राचार्य, इरा पब्लिक स्कूल चिखलठाण नं.१**

इथं सौंदर्य जन्म घेतं.. प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187

# होलसेल साडी डेपो

सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.

साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !



घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स** भवानीपेठ, करमाळा.

ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186


आमच्या मंडळाचे मार्गदर्शक
श्री.नितीन(आण्णा) घोलप यांच्या मातोश्री
श्रीमती सुमित्रा (आक्का) बाळासाहेब घोलप
यांच्या दि.३ एप्रिल २०२३ रोजी असलेल्या
अमृतमहोत्सवी वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
७५ वा वाढदिवस
शुभेच्छुक
● जय महाराष्ट्र मित्र मंडळ, करमाळा.
● जय महाराष्ट्र नागरी सह.पतसंस्था मर्या; करमाळा.


माजी आमदार
कर्मयोगी
संस्थापक/संचालक
युवक नेते
मा.सभापती, पं.स.
युवा नेते
आशीर्वाद
सचिव
प्रा.अर्जुनराव विठ्ठल सरक (सर) यांना
सेवानिवृत्तीबद्दल तसेच
भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या
सचिव पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
कर्मयोगी गोविंदबापू पाटील ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या; जेऊर
चेअरमन - संजयकुमार गादीया व्हा.चेअरमन - मुबारक शेख सचिव - अनिल श्रीपती पाटील
व्यवस्थापक - शांताराम सुतार सर्व संचालक, सभासद, कर्मचारी व पिग्मी एजंट

# हिवरवाडीमध्ये साजरा झाला विधवा सन्मान सण



करमाळा(सं.प्र.) : हिवरवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने विधवा सन्मान सणाचे आयोजन करून समाजापुढे एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. या आगळ्या-वेगळ्या आणि अभिनव सणाच्या निमित्ताने हिवरवाडीच्या सरपंच अनिता बापूराव पवार, युवा कार्यकर्ती सुप्रिया पवार यांनी विधवा प्रथा बंद करा.. हे पथनाट्य तसेच मुथोजी कॉलेजचे माजी प्राचार्य सुधीर इंगळे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख आणि कला व वाणिज्य महाविद्यालय माढा येथील मराठी विभागप्रमुख डॉ.संगीता पैकेकरी यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी हिवरवाडी येथील विधवांना समारंभपूर्वक ओवाळून हळदी-कुंकू देवून त्यांना मिठाई देण्यात आली तसेच विधवा प्रथा असे लिहिलेले कागद मेणबत्तीवर जाळून हिवरवाडी ग्रामस्थांनी विधवा प्रथा कायमची बंद करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रा.प्रदीप मोहिते यांनी एका व्हीडीओ क्लीपद्वारे केलेल्या आवाहनास अनुसरून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाच्या संयोजक सुप्रिया पवार यांनी केले. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी अशाप्रकारचा सण आणि विधवा प्रथा बंदीचा निर्धार राज्यातील कदाचित पहिलाच सण असावा; असे मत प्रा.लक्ष्मण राख यांनी व्यक्त केले तर इथून पुढे दैनंदिन जीवनात विधवांना सन्मानाने वागवले जावे; अशी अपेक्षा डॉ.संगीता पैकेकरी यांनी बोलून दाखविली. प्राचार्य सुधीर इंगळे यांनी इतिहासातील राष्ट्रमाता जिजाऊ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी वैधव्यावर मात करून इतिहासाला भरीव योगदान दिल्याची आठवण करून दिली आणि त्यांचा आदर्श समोर ठेवण्याचे आवाहन केले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून विधवा प्रथेचे उच्चाटन करणे आवश्यक असल्याचे प्रभावी सादरीकरण केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मधुकर पवार, बिभिषण सांगळे, आल्फिया शेख, राम गोडगे, अमृता आरणे, रिया परदेशी, साक्षी बोबलट, संगीता गोविंद पवार, जावेद मुलाणी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वेताळपेठ येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



करमाळा(सं.प्र.) : वेताळपेठ येथे नव्याने जिर्णोध्दार होत असलेल्या राममंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ह.भ.प.बबन महाराज विंचू यांचे किर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी भाविकांनी श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय देशपांडे, राधेशाम देवी, दर्शन कुलकर्णी, महेश परदेशी, रूपेश वनारसे, विवेक इनामदार आदींनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसचे सुनील सावंत यांच्या नेतृत्वाखाली जेलभरो आंदोलन




करमाळा(सं.प्र.): काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूल गांधी यांना सुनविलेल्या शिक्षेच्या निषेधार्थ करमाळा पोलीस स्टेशन येथे करमाळा तालुक्यातील काँग्रेसचे नेते सुनील सावंत यांच्या नेतृत्वाखाली जेलभरो आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक भुजबळ यांनी ४० कार्यकर्त्यांना अटक केली. यावेळी श्री.सावंत म्हणाले, की काँग्रेसचे नेते खा.राहूल गांधी यांच्या देशात भारत जोडो पदयात्रेमुळे देशातील सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये काँग्रेस पक्षाबद्दल आपुलकी व कार्यकर्त्यात एक प्रकारची ऊर्जा निर्माण झाली आहे. गांधी घराण्याचा इतिहास पाहिला तर त्यांच्या आजी स्व.इंदिरा गांधी, वडील स्व.राजीव गांधी यांनी देशासाठी बलिदान दिले हे विसरून चालणार नाही. अशा या घराण्यातील नेतृत्व राहूल गांधी यांना सुध्दा कुटील नितीने भाजपा सरकारने लोकसभा अध्यक्षा मार्फत दबाव आणून सचिवालयाकडून त्यांची खासदारकी रद्द केली. परंतू आता संपूर्ण जनता पेटून उठली आहे. अनेक नेत्यांचे कोर्टात केसेस चालू आहेत, परंतू त्याचा निकाल वर्षानुवर्ष लागत नाही, तोपर्यंत त्याची टर्म सुध्दा पूर्ण होते. परंतू राहूल गांधी यांच्याबाबत कोर्टाने एवढ्या लवकर निर्णय दिला आहे म्हणजेच हा पूर्वनियोजित कट आहे; असेही श्री.सावंत यांनी सांगितले.

# आर्चरी स्पर्धेत शिवम चिखले यास सुवर्णपदक



करमाळा(सं.प्र.) : शिलाँग येथे झालेल्या नॅशनल रँकिंग आर्चरी स्पर्धेत एकलव्य अकॅडमी मोडनिंबचा तिरंदाज शिवम राजेंद्र चिखले याने पहिल्या दिवशी ३१८ आणि ३२२ स्कोर प्राप्त करून राष्ट्रीय रँकिंग स्पर्धेत पहिल्या दिवशी आठवे स्थान प्राप्त केले. तर दुसऱ्या दिवशी इलिमेशन मध्ये शिवम चिखले याने राजस्थान, गुजरात, दिल्ली अशा तिरंदाज यांना पराभूत करून इलिमेशन राऊंडमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

शिवम चिखले हा सुवर्णपदक प्राप्त करणारा सोलापूर जिल्ह्यातील एकमेव तिरंदाज असून सध्या तो एकलव्य अकॅडमी मोडनिंब विठ्ठल भालेराव यांचे मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. सध्या तो नववीमध्ये शिकत आहे. लहान वयात त्याने नॅशनल आर्चरी टूर्नामेंट मध्ये सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल त्याचे करमाळा तालुक्यासह जिल्ह्यात कौतूक होत आहे.

# शरदचंद दोशी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : येथील व्यापारी शरदचंद नेमचंद दोशी (वय-७५) यांचे अल्प आजाराने ३० मार्च रोजी पहाटे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. अतिशय मनमिळाऊ व सर्वांना मदत करण्याचा स्वभाव होता. सतत हास्यमुर्ती म्हणून त्यांची ओळख होती. गेल्या दीड वर्षापासून ते आजारी होते. त्यांचे जेऊर येथे मेडिकल तर करमाळा येथे किराणा मालाचे दुकान आहे. प्रितम दोशी व शितल दोशी यांचे ते वडील होते. अंत्यविधीप्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

**गाळे भाड्याने देणे आहे**

पांडे रोडवरील १३ X २४ चा लाईट, पाणी आदी सुविधा असलेला एक गाळा तसेच दत्तपेठेतील दुकानासाठी उपयुक्त असलेला गाळा (मिठाई दुकान) भाड्याने देणे आहे

०: संपर्क :०

रमेश टांगडे, मो.९७३००४३०६४, ७०२८२०७००४


प्रोप्रा : मुलाणी ब्रदर्स
मो.9730040016
मो.9850024554

**अलिशा**
चिकन & मटन शॉप

दर मंगळवारी व शुक्रवारी बोकडाचे मटन मिळेल

कंपनी टू ग्राहक नामवंत कंपनीचे चिकन मिळेल.

चिकन 180/- किलो



जामखेड रोड, बुरूड यांचे शेजारी, कृ.उ.बा.स.गाळा नं.५१, करमाळा.

# हनुमान जन्मभूमी कुगाव चे 'भीमा महात्म्य' या पौराणिक ग्रंथातील अध्याय ३३ चे

# मराठी भाषांतर


कुगाव येथील पुरातन हनुमानाचे मंदिर




कुगाव येथील जीर्णोंधारीत हनुमानाचे मंदिर




श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीमातापितृभ्यांनमः ॥ श्रीभीमाशंकरायनमः ॥ ॐनमोजीआदिपुरुषा ॥ जगदंब्यामायाविलासा ॥ गौरीरमणाधर्माध्यक्षा ॥ अनंतनामाजगत्पते ॥ १ ॥ सर्वदेवांमाजीश्रेष्ठ ॥ विरक्तांमाजीवरिष्ठ ॥ प्रलयाग्नीवतकोपिष्ठ ॥ आजनुबाहु ॥ २ ॥ सर्वजगातेंपालनकरिसी ॥ पापिष्ठजनांउद्धरिशी ॥ नामानामातीतअससी ॥ पार्वतीरमणा ॥ ३ ॥ साधुजनांचेंपालनकरिशी ॥ दुष्टजनांतेंशिक्षालाविशी ॥ भजकांलागींप्रसन्नहोशी ॥ गणअसतीसेवेशीतुझ्या ॥ ४ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ पुढेंश्रवणकराहनुमत्तीर्थमहिमेसी ॥ विधिसांगेनारदासी ॥ चरित्रश्रवणकरींपुढें ॥ ५ ॥ दुसरेंअसेकूर्मतीर्थ ॥ कूर्मग्रामअसेविख्यात ॥ स्मरणेंभुक्तिमुक्तिहोतीप्राप्त ॥ स्नानमात्रेंकार्यसिद्धी ॥ ६ ॥ त्याकूर्मनामकग्रामात ॥ वीतहव्यनामकऋषिख्यात ॥ तपश्चर्याहोताकरीत ॥ एकनिष्ठंकरूनियां ॥ ७ ॥ भीमातीराचियेठाईं ॥ तोकूर्मग्रामअसेपाहीं ॥ तेथेंतोतपकरीवीतहव्यही ॥ विष्णुध्यानकरीतसे ॥ ८ ॥ ब्राह्मणाचानाशकरावयाशी ॥ मधुकैटभशोणिताशी ॥ प्राप्तजाहलेतेस्थानाशी ॥ महाक्रोधेंकरूनियां ॥ ९ ॥ तयांतेंकरितांअवलोकन ॥ कूर्मरूपधरिलेंविष्णून ॥ सुदर्शनचक्रेंकरून ॥ तयांअसुरांमारिलें ॥ १० ॥ तेथेंजाहलेंकूर्मतीर्थ ॥ त्यांतभक्तीनेंजोस्नानकरित ॥ तयाचेमानसिकसंपूर्णहेत ॥ पूर्णहोतीतात्काळीं ॥ ११ ॥ तेथेंकरितांतर्पण ॥ नरकींअसतीजरीपितृगण ॥ तात्काळमुक्तहोवोन ॥ स्वर्गीनांदतीसौख्यानें ॥ १२ ॥ त्याकूर्मग्रामींदुसरेंतीर्थ ॥ नामअसेहनुमंत ॥ तयाचेंजोस्मरणकरित ॥ तयासीमुक्तीप्राप्तहोई ॥ ॥ १३ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ त्याचेंतीर्थम्यांतुम्हांसी ॥ सांगतोंऐकाएकभावेंसी ॥ भुक्तिमुक्तीलाधती ॥ १४ ॥ इंद्रलोकींच्याअप्सरेसी ॥ शापप्राप्तझालापरियेसीं ॥ वानरस्वरूपजाहलेंतीसी ॥ नामअसेअंजना ॥ १५ ॥ तीसौख्येंकूर्मक्षेत्रीं ॥ तीर्थस्थानींवासकरी ॥ ऋतुप्राप्तझालाएकेअवसरीं ॥ चिंताकरीमानसीं ॥ १६ ॥ कोणकरीलिऋतुकालपूर्ण ॥ इतुक्यांतवायूयेवोन ॥ भोगदेईतिजलागून ॥ गर्भवतीजाहली ॥ १७ ॥ नवमासभरतांपरिपूर्ण ॥ पुत्रजाहलाहनुमान ॥ तेणेंलंकेंतजावोन ॥ राक्षससंपूर्णवधियेले ॥ १८ ॥ तेथेंकृतकार्यहोवोनी ॥ पुनरपीपूर्वस्थानींयेवोनी ॥ वासकरीशिवध्यानीं ॥ रतअसेनिरंतर ॥ १९ ॥ तेथेंजाहलेंहनुमत्तीर्थ ॥ पापीजनांतेंमुक्तकरित ॥ तयाचेंजेसेवनकरित ॥ पापमुक्तहोतीते ॥ २० ॥ तयाचेंजेघेतीदर्शन ॥ तयांचेहेतूहोतीपूर्ण ॥ एकोनतीसलक्षलिंगेंजाण ॥ तयातीर्थीआसती ॥ २१ ॥ इंद्रादिकसुरवर ॥ वसिष्ठादीऋपीश्वर ॥ सिद्धचारणगुह्यककिन्नर ॥ सेवाकरितीतीर्थाची ॥ ॥ २२ ॥ ब्रह्मदेवम्हणेनारदासी ॥ भैरवतीर्थाचियेमाहिमेसी ॥ श्रवणकरींएकचित्तेंसी ॥ पापनाशकतीर्थतें ॥ २३ ॥ भुक्तिमुक्तिप्रदजाण ॥ सर्वपापाचेंनाशन ॥ सर्वरोगांकरीशमन ॥ सिद्धिदायकअसेतें ॥ २४ ॥ तयाचासांगाइतिहास ॥ नारदम्हणेब्रह्मदेवास ॥ तात्काळआलाउल्हास ॥ ब्रह्मदेवाकारणें ॥ २५ ॥ चतुर्भुजनारायण ॥ सृष्टिकर्ताब्रह्मदेवजाण ॥ मायेनेंमोहितहोऊन ॥ परस्परबोलती ॥ २६ ॥ जगतामाजीमीचश्रेष्ठ ॥ मजहूनिअन्यनसेवरिष्ठ ॥ परस्परम्हणतीमीचश्रेष्ठ ॥ संवादकरितीयेणेंपरी ॥ २७ ॥ देवांसिविचारितीतेकाळीं ॥ आम्हांहूनीकोणबळी ॥ यसतअसेयाभूमंडळीं ॥ तेआम्हांलागींनिवेदावें ॥ २८ ॥ देवम्हणतीब्रह्मविष्णूसी ॥ शंकरश्रेष्ठअसेकैलासीं ॥ ऐशाऐकतांवचनासी ॥ विधिवैकुंठक्रोधावले ॥ २९ ॥ निंदाकरितीशंकराची ॥ उरगभूषणेंअसतीत्याचीं ॥ आवडीअसेस्मशानाची ॥ तयानीचाकारणें ॥ ३० ॥ ऐसेंबोलोनियांवचन ॥ विधीचेंपंचमशिरकरीगर्जन ॥ तोंध्वनीशिवेंऐकोन ॥ क्रोधायमानजाहला ॥ भयंकरधरिलीआकृती ॥ तयातेंभैरवनामनिश्चिती ॥ जींइंद्रियेंअपराधकरिती ॥ तयांचानाशकरीतसे ॥ ३१ ॥ ब्रह्मदेवाचेंपंचमशिर ॥ नखेंछेदिताझालाशंकर ॥ तात्काळजाहलाहाहाःकार ॥ गर्वरहितहोयब्रह्मा ॥ ३२ ॥ भीमातीर्थाचियेतीरीं ॥ भैरवयेवोनिवास्तव्यकरी ॥ नामेंभैरवतीर्थनिर्धारीं ॥ प्रसिद्धतेथेंजाहलें ॥ ३३ ॥ तेथेंकरितीस्नानदान ॥ जेकरितीभक्तीकरून ॥ तयांचेहेतूसंपूर्ण ॥ पूर्णहोतीतात्काळीं ॥ ३४ ॥ तेथेंअसेकोटिलिंग ॥ तेथेंजेकरितीकर्मसांग ॥ तयांतेंसौख्यलागवेग ॥ प्राप्तहोईनिर्धारीं ॥ ३५ ॥ त्याकोटीश्वरेंजाण ॥ क्षेत्रचिखलनामकस्थापून ॥ तेथेंवासकरीआपण ॥ महानंदेंकरूनियां ॥ ॥ ३६ ॥ नारदम्हणेब्रह्मदेवासी ॥ कोटीश्वरेंकांस्थापिलंक्षेत्रासी ॥ सांगामजत्याइतिहासासी ॥ विचारीतसेंनम्रत्वें ॥ ३७ ॥ ब्रह्मदेवम्हणेनारदासी ॥ त्याचिखलनामकस्थानासी ॥ पृथ्वीपतीचिखलपरियेसीं ॥ तपाचरणकरीतसे ॥ ३८ ॥ कोटीश्वराचेंकरीध्यान ॥ तपकरीतसेदारुण ॥ कोटिलिंगजालेंप्रसन्न ॥ वरमागम्हणेत्यातें ॥ ॥ ३९ ॥ जरीप्रसन्नझालासीदेवा ॥ मजलागींऐसावरद्यावा ॥ ममनामेंग्रामप्रसिद्धव्हावा ॥ तीर्थहीव्हावेंतैसेंची ॥ ४० ॥ तथास्तुम्हणेकोटेश्वर ॥ ऐसादेवोनितयावर ॥ अंतर्धानपावेसत्वर ॥ सूतम्हणेशौनकादिकां ॥ ४१ ॥ तेस्थानींजेस्नानकरिती ॥ तयांभुक्तिमुक्तीप्राप्तहोती ॥ दर्शनेंमिळेविपुलसंपत्ती ॥ अखिलसौख्यप्राप्तहोई ॥ ॥ ४२ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ विधीनेंसांगीतलेंनारदासी ॥ तेंचरित्रम्यांतुम्हांसी ॥ यथामतीनिवेदिलें ॥ ४३ ॥ रामाश्रयेंकरूनिजाण ॥ याग्रंथाचेंलेखन ॥ तेंसैंचिदत्तकृपेन ॥ केलेंअसेमान्यअसो ॥ ४४ ॥ इतिश्रीपद्मपुराणे उत्तरसंहितांतर्गत भीमाचरित्रे सूतकथितकथाकल्पतरौ कूर्मतीर्थहनुमत्तीर्थभैरवतीर्थकोटीश्वरतीर्थमहिमावर्णनंनामत्रयस्त्रिंशत्तमाध्यायगोडहा ॥ ३३ ॥ ओंव्यासंख्या ॥ २०३५ ॥

॥ भीमामहात्म्य अध्याय ३३ ॥

## मराठी भाषांतर

श्री गणेशाय नम: ॥ श्री सरस्वती देवी नम: ॥ श्री गुरूभ्यो नम: ॥ श्री मातापिताय नम: ॥ श्री भीमाशंकराय नम: ॥
ॐ आदिपुरूषाय नम: ॥ जगत्माता विलासा वंदन असो ॥ गौरीरमनाच्यक्षा ॥ अनंतानामा जगत्पते ॥१॥
सर्वश्रेष्ठ देवा, विरंकत्यांमधील श्रेष्ठा, प्रलय-अग्निसमकोपिष्ठ, गुडघ्यापर्यंत हात असलेला ॥२॥
सर्व जगताचे पालन करतोस, पापी जनांचा उध्दार करतोस, नाम-अनामाच्या पलीकडे असतोस, पार्वतीचा पती ॥३॥
साधुसज्जनांचे पालन करतोस, दुष्टजनांना शिक्षा करतोस, भजन करणाऱ्यांना प्रसन्न होतोस, तुझ्या सेवेला गण असतात ॥४॥
शौनकऋषींना सुत सांगतात, पुढे हनुमन्ततीर्थमहिमा श्रवण करा, हा विधी नारदाला सांगत आहेत, पुढे चरित्र श्रवण करा ॥५॥
दुसरे कूर्मतीर्थ आहे, कूर्मग्राम प्रसिध्द आहे. त्याच्या केवळ स्मरणाने भुक्ति-मुक्ति प्राप्त होतात (कूर्मतीर्थावर) स्नानाने कार्यसिध्दी होते ॥६॥
त्या कूर्मग्राममध्ये वीतहव्य नावाचे ऋषी प्रसिध्द होते, ते तपश्चर्या करीत होते, एकनिष्ठपणे ॥७॥
भीमानदीच्या तीरावर कूर्मग्राम होते तेथे ते अव्याहतपणे तप करीत होते. भगवान विष्णूचे ध्यान करीत असे ॥८॥
मधुकैटभ राक्षस ब्राह्मणाचा नाश करण्यासाठी भयंकर क्रोधाने त्या ठिकाणी (कूर्मतीर्थ) आले ॥९॥
भगवान विष्णूने त्यांना पाहून कूर्मरूप धारण केले आणि सुदर्शन चक्राने त्या राक्षसाला ठार मारले ॥१०॥
तेथे कूर्मतीर्थ निर्माण झाले. तेथे भक्तिभावाने जे स्नान करतील त्यांचे मनोरथ तात्काळ पूर्ण होतील ॥११॥
त्या ठिकाणी तर्पण(श्राध्द) केले असता पितृगण(पूर्वज) नरकात असतील तरी तात्काळ मुक्त होवून स्वर्गामध्ये सुखाने राहतील ॥१२॥
कूर्मग्राममध्ये हनुमंततीर्थ नावाचे दूसरे तीर्थ आहे. त्याचे स्मरण करणारा मुक्ती पावेल ॥१३॥
शौनकऋषींना सुत म्हणतात, त्या तीर्थाचे महत्व तुम्हांस सांगतो, ते तुम्ही श्रध्देने ऐका. त्यापासून भुक्ती-मुक्तीचा लाभ होईल ॥१४॥
इंद्रलोकीच्या अप्सरेला शाप मिळाला. त्यामुळे तिला वानररूप मिळाले, तिचे नांव अंजना ॥१५॥
ती कूर्मक्षेत्रावर आनंदाने रहात होती. एकदा ऋतुप्राप्ती झाल्यावर ती मनात चिंता करीत होती ॥१६॥
तिची इच्छा(ऋतुकाल) कोण पूर्ण करील ? इतक्यात वायूदेवाने येवून तिला भोग दिला (इच्छा पूर्ण केली) ती गर्भवती झाली ॥१७॥
नऊ महिने पूर्ण होताच तिला पुत्र झाला तो हनुमान. त्याने लंकेत जाऊन राक्षसांचा वध केला ॥१८॥
तेथील कार्य पूर्ण झाल्यावर हनुमान पुन्हा पूर्वस्थानी येवून शिवाचे ध्यान करण्यात मग्न असे ॥१९॥
तेथे हनुमान तीर्थ निर्माण झाले. पापी जनांना मुक्त करण्यासाठी हनुमत्ततीर्थ सेवन करणारे पापातून मुक्त होतात ॥२०॥
हनुमत्ततीर्थाचे जे दर्शन करतील त्यांचे सकलहेतू पूर्ण होतील. हनुमत्ततीर्थावर एकोणतीस लक्ष शिवलिंग आहेत ॥२१॥
इंद्र आणि इतर देवता, वशिष्ठ ऋषी आणि इतर ऋषी सिध्दी, गुप्तज्ञान मिळवलेले किन्नर या तीर्थाची सेवा करतात ॥२२॥
ब्रह्मदेव नारदमुनींना सांगतात, भैरवतीर्थाचा महिमा एकचित्ताने, लक्षपूर्वक ऐका, ते पापनाशक तीर्थ आहे ॥२३॥
भुक्तिमुक्ति मिळवून देणारे, सर्व पापांचा नाश करणारे, सर्व रोगांचे शमन करणारे, सिध्दी प्राप्त करून देणारे हे तीर्थ आहे ॥२४॥
नारदमुनी ब्रह्मदेवास म्हणाले, त्याचा इतिहास सांगावा, ब्रह्मदेवांना देखील सांगण्याचा उत्साह आला ॥२५॥
चारभुजा असलेला (चतुर्भूज) नारायण, सृष्टीकर्ता ब्रह्मदेव मायेने मोहित होवून एकमेकांशी बोलू लागले ॥२६॥
जगामध्ये मीच सर्वश्रेष्ठ आहे, माझ्यापेक्षा वरीष्ठ कोणीच नाही. परस्परांना मीच श्रेष्ठ म्हणू लागले ॥२७॥
देवांनाही ते तेंव्हा विचारू लागले, या भूमंडळामध्ये आमच्यापेक्षा बलवान कोण आहे ? ते आम्हाला सांगावे ॥२८॥
देव ब्रह्माविष्णूंना म्हणाले, कैलास पर्वतावर शंकर श्रेष्ठ आहेत. देवांचे हे बोलणे ऐकून विधी वैकुंठपती संतापले ॥२९॥
ते शंकराची निंदा करू लागले, कवट्यांची माळ धारण करतो, स्मशानामध्ये राहतो (स्मशानाची आवड आहे) तो नीच आहे ॥३०॥
असे बोलून ब्रह्मदेवाचे पाचवे शीर गर्जना करू लागले. त्याचा आवाज ऐकून भगवान शिव संतप्त झाले. त्यांनी भयंकर रूप धारण केले, त्याचे नाव भैरव. ज्या इंद्रियांनी अपराध केला,त्यांचा(भैरावने) नाश केला ॥३१॥
ब्रह्मदेवाचे पाचवे शिर (मस्तक) नखे शंकराने छेद केला. तेथे हाहाकार झाला, ब्रह्मदेवाचा गर्वनाश झाला ॥३२॥
भीमातीराच्या तीर्थावर भैरवाने येवून वास्तव्य केले. ते तीर्थ भैरवतीर्थ म्हणून प्रसिध्द झाले ॥३३॥
तेथे जे भक्तीपूर्वक स्नान-दान करतात त्यांचे सगळे हेतू तात्काळ पूर्ण होतात ॥३४॥
तेथे कोटलिंग तीर्थ आहे. ते जे कार्य करणाऱ्यांना निश्चितपणे सौख्य प्राप्त होते ॥३५॥
त्या कोटिश्वराने जाणून, चिखलक्षेत्राच्या नावाने स्थापना करून महानंदेसह (पार्वती) राहू लागले ॥३६॥
नारदमुनी ब्रह्मदेवास म्हणतात, या क्षेत्री कोटिश्वराची स्थापना का झाली, त्याचा इतिहास मला सांगा असे नारदमुनी नम्रपणे विचारतात ॥३७॥
ब्रह्मदेव नारदाला सांगतात, त्या चिखल नावाच्या ठिकाणी पृथ्वीपती तपाचरण करतात ॥३८॥
कोटीश्वराचे ध्यान करून भयंकर तप करतात. कोटीलिंगाने प्रसन्न होवून वर मागण्यास सांगितले ॥३९॥
देवा, मला प्रसन्न झाला असालतर मला असा वर द्यावा की माझ्या नावाने गाव प्रसिध्द व्हावे, ते तीर्थक्षेत्र व्हावे ॥४०॥
कोटेश्वर तथास्तु म्हणाले, वर देऊन ते अंतर्धान पावले. शौनऋषींना सूत म्हणाले ॥४१॥
त्या ठिकाणी जे स्नान करतात त्यांना भुक्ति-मुक्ति प्राप्त होतात, दर्शनाने भरपूर संपत्ती मिळते, सर्व सुख प्राप्त होतात ॥४२॥
शौनकऋषींना सूत म्हणाले, ब्रह्मदेवाने नारदाला सांगितले ते चरित्र मी तुम्हालामाझ्या मतीप्रमाणे (बुध्दीप्रमाणे) निवेदन केले ॥४३॥
श्रीरामाच्या आश्रयाने जाणून या ग्रंथाचे लेखन श्री दत्तकृपेने केले ते मान्य असावे ॥४४॥

**याप्रमाणे श्रीमद्मपुराणातील उत्तरसंहिता अंतर्गत भीमाचरित्र सूतांनी सांगितलेली कथाकल्पतरू कूर्मतीर्थ, हनुमत्ततीर्थ, भैरवतीर्थ, कोटीश्वरतीर्थ महिमा वर्णन नाम तेहतीसावा अध्याय गोडा हा ॥ अध्याय ३३ ॥**

**संकलन : सौ.तेजस्विनी दयानंद कोकरे**
(माजी सरपंच, ग्रामपंचायत कुगाव)
हनुमान जन्मभुमी कुगाव (कुर्मग्राम), ता.करमाळा.

**समस्त ग्रामस्थ श्री क्षेत्र हनुमान जन्मभुमी कुगाव, ता.करमाळा., जि.सोलापूर**


माजी आमदार
सचिव
प्रा.अर्जुनराव विठ्ठल सरक (सर)
यांना सेवानिवृत्तीबद्दल तसेच
भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या
नूतन सचिव पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
भारत महाविद्यालय, जेऊर.
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वृंद


करमाळा नगरीच्या मा.उपनगराध्यक्षा
श्रीमती सुमित्रा (आक्का) बाळासाहेब घोलप
यांच्या दि.३ एप्रिल २०२३ रोजी असलेल्या
अमृतमहोत्सवी सोहळ्यास
हार्दिक शुभेच्छा
७५ वा वाढदिवस
शुभेच्छुक
● श्री.सिध्दार्थ नारायण चव्हाण (मुख्याध्यापक)
● सौ.वंदना सिध्दार्थ चव्हाण ● श्री.ऋषीकेश सिध्दार्थ चव्हाण (बँक मॅनेजर)
● डॉ.सौरभ सिध्दार्थ चव्हाण (M.S.Surgeon)
● डॉ.सौ.शुभदा सौरभ चव्हाण (M.D.) ● सौ.स्वप्नाली ऋषीकेश चव्हाण
समस्त चव्हाण परिवार, इंदापूर